## प्रेसनोट

जा.क्र.६१५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०९/२०१७

**" अल्पवयीन बालीका विनयभंगाचे गुन्हयात आरोपीस चार वर्षे सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"**

भंडारा:— भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत ग्राम निष्ठी जि.भंडारा येथील तक्रारदार पिडीत बालीका हिने दि. ३०/०७/२०१५ ला पोस्टे पवनी येथे लेखी तक्रार दिली की, आरोपी अजय उत्तम गजभिये याने पिडीत तक्रारीला माहे जानेवारी २०१५ मध्ये " आय लव यु" असे लिहलेली चिट्टी दिली, ही माहिती आपले आई वडीलांना सांगितल्याने अजय उत्तम गजभिये यास समजावुन सांगितले यावरुन त्याने असे कृत्य करणार नाही असे बोलला, परंतु दिनांक २०/०७/२०१५ रोजी ही पवनी येथे शाळेत जाण्याकरीता आपले गावातील बस स्टॉप येथे बसची वाट पाहत असतांना आरोपी अजय उत्तम गजभिये हा पाठलाग करुन वाईट वाईट शेर शाहीरी मारतो व बसस्टॉपचे भिंतीवर पिडीत तक्रारदारचे नाव लिहुन नावापुढे आय लव यु असे लिहतो. दिंनाक २२/०७/२०१५ रोजी सकाळी ०९.३० वा. तक्रारदार शाळेत जाणे करीता आपले मैत्रीणीसह निष्ठी बसस्टॉपवर आली. आरोपी याने शेर शाहीरी करुन पाहुन टाकीण अशी धमकी दिली. अश्या घटने बाबत पिडीतेने तक्रार दिल्याने आरोपी अजय उत्तम गजभिये रा. निष्ठी यांचे विरुध्द अप क्र. ८३/२०१५कलम ३५४(अ) (ड) भा.द.वी. सहकलम बालकावरील लैगिंक अत्याचार प्रतीबंधक अधिनीयम २०१२ कलम ११ (१)(४) १२ अधीनीयम अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयात तपास पोलीस हवालदार कवळु कटारे बं. नं. ६९९ पोस्टे पवनी यांनी केला व गुन्हयात आरोपी नामे अजय उत्तम गजभिये, वय १८ वर्ष, रा. निष्ठी ता. पवनी जिल्हा भंडारा यास अटक केली व तपास पुर्ण करून आरोपी विरूध्द विशेष सत्र न्यायालय भंडारा येथे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुनावणी मा. विशेष सत्र न्यायाधिश श्री आर.पी. पांडे सा. यांचे समक्ष साक्ष पुरावा चालला असुन गुन्हयात सरकार पक्षातर्फे श्री. विश्वास तवले सहा. सहकारी अभियोक्ता सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडली. आज दिनांक ०१.०९.२०१७ रोजी गुन्हयात मा. सत्र न्यायाधीश यांनी आरोपी **नामे अजय उत्तम गजभिये, वय १८ वर्ष, रा. निष्ठी यास सदर गुन्हयात दोषी ठरवुन कलम ३५४ (अ) भांदवि मध्ये एक वर्षे सश्रम कारावास व १,०००/रु दंड, दंड न भरल्यास २ महिणे सश्रम कारावास, ३५४ (ड) भादवि मध्ये एक वर्ष सश्रम कारावास व १०००/—रु दंड, दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावास, बालकांवरील लैगिंक अत्याचार प्रतिबंधक अधिनीयम २०१२ कलम ११(१)(४)१२ मध्ये दोन वर्ष सश्रम कारावास व २,०००/—रु दंड, दंड न भरल्यास ३ महिणे कारावासाची शिक्षा सुनावली,**

सदर गुन्हयात पोलीस नाईक चंद्रशेखर पटले बं. न. ७७९ पो. स्टे पवनी यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**(कृपया समोरच्या पहील्या पानावर देण्यास विनंती)**

सपोनी. पी. के. बोरकुटे
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९६५७४०७१७३

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.